एमेलाइन पँकहर्स्ट

स्त्रियांना मताधिकार

लेखिका: एम्मा फिशेल

चित्रे: मार्टीन रेम्फ्री



एमेलाइन पॅंकहर्स्ट

एमेलाइनचा जन्म त्या काळात झाला जेव्हा मुलीचा जन्म बरा मानला जात नसे.



त्या काळचे लोक म्हणत, “मुलांनी महत्त्वाच्या गोष्टींचं शिक्षण घेतलं पाहिजे, पण मुलींना शिकायची काहीच गरज नाही. शेवटी पुरुषच कुटुंबाचा प्रमुख असतो!”

एमेलाइन मोठी झाली तेव्हा तिला हे सगळं बदलून टाकावेसे वाटू लागले.

एमेलाइनचे बालपण सुखात गेले. तिचे आईवडील दयाळू आणि श्रीमंत होते. ते नेहमी गरीब लोकांची मदत करत.

कधीकधी एमेलाइनसुद्धा मदत करत असे.



पण लवकरच तिला उमगले की श्रीमंत मुलींनाही आयुष्यात बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते.

तिचे पाच छोटे भाऊ मोठे झाल्यावर डॉक्टर वा वकील बनू शकत होते किंवा इतर महत्त्वाचे काम करू शकत होते.



पण तिने आणि तिच्या चार छोट्या बहिणींनी घरी बसून नवऱ्याची वाट पाहावी, अशी समाजाची अपेक्षा असे.

एमेलाइन चौदा वर्षांची झाली तेव्हा आपल्या आईसोबत एका सभेला गेली. ती सभा “मत (व्होट)” या गोष्टीशी संबंधीत होती.

मतदार हे देशाचे नेतृत्व करणाऱ्या लोकांना निवडू शकतात. हे लोक मग नियम, कायदे बनवतात. त्याकाळी फक्त पुरुषच मत देऊ शकत होते, स्त्रियांना तो हक्क नव्हता.



एमेलाइनने सभेतील भाषण लक्षपूर्वक ऐकले:

“नियम-कायदे पुरुष बनवतात. हा स्त्रियांवर अन्याय आहे,” एक वक्ता बोलत होती. “स्त्रियांनाही मतदानाचा हक्क मिळायला हवा. त्यांनाही नवे कायदे बनवण्याची संधी मिळायला हवी.”



एमेलाइनच्या आईवडिलांनी तिला इतर मुलींपेक्षा जास्त शिक्षण दिले. खरंतर, एमेलाइनचाच शिक्षण घेण्याचा आग्रह होता.

त्याकाळी मोठ्या मुलींसाठी फारशा शाळा नव्हत्या. एमेलाइन फ्रान्सच्या एका शाळेत शिकायला गेली.



पण घरी परतली तेव्हा तिला प्रश्न पडला की पुढे काय करायचे. मग तिची भेट *रिचर्ड पँकहर्स्ट*शी झाली....



वयाच्या 21 व्या वर्षी एमेलाइनने लग्न केले. तेव्हा पँकहर्स्टचे वय होते 40 वर्षे.

रिचर्ड एक चांगला वकील होता. पण त्याने फारसा पैसा कमावला नाही. त्याने नेहमी वकिलाची फी न परवडणाऱ्या गरीब लोकांना मदत करण्यास प्राधान्य दिले.

“तुम्ही राजकारणात जा,” एमेलाइन म्हणाली. “मग परिस्थिती बदलू शकाल तुम्ही.”




त्याकाळच्या लोकांना पँकहर्स्टचे विचार धक्कादायक वाटत. त्यामुळे लोकांनी त्याला मत दिले नाही.

एमेलाइन आणि तिचे वडील यांच्यात रिचर्डवरून कडाक्याचे भांडण झाले. पुढे त्यांनी एकमेकांशी कायम अबोला धरला.




एव्हाना एमेलाइन आणि रिचर्ड यांना चार मुले झाली. त्यांच्या डोक्यात एक कल्पना आली. “आपण लंडनला जाऊ. तिथे मी एक दुकान उघडते. आपण भरपूर पैसा कमवू,” एमेलाइन म्हणाली.

पण लंडनच्या त्या गरीब वस्तीत कुणीही त्यांच्याकडील महागड्या वस्तू खरेदी करू शकत नव्हते.



मग त्यांचा मुलगा *फ्रँक* खूप आजारी पडला. त्यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

“गलिच्छ रस्ते, खराब नाले – नशीब! तुमचा एकच मुलगा गेला!” डॉक्टर म्हणाले. “बऱ्याचदा गरीबांची मुलं लहानपणीच मरतात!”



एकदा कडाक्याच्या थंडीत ते मँचेस्टरला परतले. गरीबांचे आयुष्य किती भीषण असते, हे एमेलाइनने तिथे पाहिले. अनेक लोक कारखान्यातच राहात. ती जागा ओंगळ आणि भयानक असे.



काही लोक कारखान्यात काम करण्याऐवजी भुकेले राहाणे पसंत करत. राजकारणी त्यांना काहीही मदत करत नसत. पण पँकहर्स्टने काहीतरी केले.



“श्रीमंतांकडे बरीच संपत्ती असते,” एमेलाइन म्हणाली. “आणि गरीबांकडे काहीच नसते. स्त्रिया ही परिस्थिती बदलू शकतील!”

एमेलाइन 30 वर्षांची असताना फ्रान्समधील आपल्या एक जुन्या शाळासोबत्यास भेटायला गेली. पण त्याचवेळी रिचर्ड आजारी असल्याची बातमी तिला कळली आणि ती घरी परतली.



तिला पोहोचायला उशीरच झाला.

रिचर्ड मरण पावला होता.

आता एमेलाइनला आपल्या कुटुंबियांचे पोट भरण्यासाठी काम करणे भाग होते. आपल्या नव्या नोकरीत तिने गरीब लोकांचे खडतर आयुष्य जवळून पाहिले.



"मी लोकांच्या पाठिंब्याविना आणि मताशिवाय काहीच बदल घडवू शकत नाही," एमेलाइन म्हणाली.
पुढे काय करायचे, हे तिला हळूहळू उमगू लागले....

एमेलाइनने आपली मुलगी, *ख्रिस्ताबेल*सोबत मिळून एक संघटना काढली.

त्यांनी रस्त्यांच्या कोपऱ्यांवर, बागांमध्ये....शक्य होईल तिथे भाषणे दिली.



त्या काळात इंग्लंडमध्ये राजकारण्यांचे तीन प्रमुख पक्ष होते. एमेलाइनला कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी त्यांची मदत घेणे गरजेचे होते.

"मी नक्कीच मदत करेन," मजूर पक्षाचे नेते *हार्डी* म्हणाले.



परंपरावाद्यांनी मात्र हे विधेयक नामंजूर कसे होईल, याची व्यवस्था केली.

“उदारमतवादी पक्ष आमची साथ देणार का?” ख्रिस्ताबेलने विचारले. पण त्यांनी तिच्याशी बोलणेसुद्धा टाळले.

ख्रिस्ताबेलने त्यांच्याकडून उत्तर मिळवण्याचा प्रयत्न केला. ही सारी घटनावळ वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर छापून आली.



तीन दिवसांनी तिची सुटका झाली. त्या दिवशी संध्याकाळच्या सभेत नेहमीपेक्षा जास्त लोक उपस्थित राहिले.



“सरकारने आपली दखल घ्यायलाच हवी!” एमेलाइन आपल्या समर्थकांना म्हणाली. “घोषणा द्या! व्यत्यय आणा! उपद्रव द्या!”

“घोषणा द्या! व्यत्यय आणा! आम्हाला हे जमणार नाही!” बऱ्याच स्त्रिया म्हणाल्या. “कसं करायचं हे?”

एमेलाइनने त्यांना मार्ग दाखवला.



कुणीही राजकारणी नेता, मग तो कितीही महत्त्वाचा का असेना, सुरक्षित राहिला नाही, अशी परिस्थिती झाली.



पोलीस स्त्रियांना तेथून बाहेर काढू लागले.

एमेलाइन म्हणाली, “ते आपल्याला बाहेर काढतायत. आपले फलक आणि झेंडे लपवा. आपले चेहरे झाकून घ्या. कुणाला शंका येऊ देऊ नका. मगच हल्ला चढवा!”

“या स्त्रियांचे वर्तन असभ्य आहे,” राजकारणी नेता रागारागात म्हणाला.


“हीच एकमेव पद्धत आहे,” एमेलाइन म्हणाली. “आम्ही लोकांपुढेच आमची बाजू मांडू!” मग ती अहोरात्र याची योजना बनवण्यात मग्न झाली.



“आता पहिल्या हल्ल्याची वेळ आलीय!” एमेलाइन म्हणाली. “आपण संसदेवर मोर्चा काढायचा.”

मोर्चात चारशे स्त्रिया सहभागी झाल्या. पण त्यांना संसदेचे द्वार बंद असल्याचे आढळले.

स्त्रियांची सामाजिक आणि राजकीय संघटना



“ते आपल्या मार्गात अडथळे आणू शकतात, पण आपल्याला थांबवू शकत नाहीत. आपला लढा असाच सुरू राहील!” एमेलाइन म्हणाली.

त्यांच्या आंदोलनाचा जोर हळूहळू वाढतच गेला.



एमेलाइन 50 वर्षांची झाली. ती आधीपेक्षा जास्त कामात मग्न होती. “आपली मोहीम तडीस न्यायची असेल तर लोकांची मदत हवी,” तिने एकदा हार्डीला म्हटले.

“तुला मदत करू शकतील असे काही लोक आहेत,” केयर हार्डी म्हणाले. “हे लोक प्रतिष्ठीत, बुद्धिमान आणि निधी जमवण्यात हुशार आहेत!”



काळ वेगाने पुढे सरकला. स्त्रिया डॉक्टर बनू लागल्या, विद्यापीठात शिकू लागल्या. पण राजकारण्यांनी त्यांना मतदानाचा हक्क देण्याबाबतीत काहीही केले नाही. स्त्रियांचा संयम संपत चालला.



दररोज अधिकाधिक स्त्रिया एमेलाइनच्या मोर्च्यांत सामील होऊ लागल्या.

“काय करायचं ते फक्त सांगा. तुमच्यामुळेच आम्हाला आम्ही कणखर, स्वाभिमानी आणि शूर आहोत, याची जाणीव झाली!”



स्त्रिया मोठमोठ्याने घोषणा देऊ लागल्या. पोलिसही तेवढेच कठोर वागू लागले.

दोन स्त्रियांनी पंतप्रधानांच्या घराच्या खिडक्या दगड मारून फोडल्या. लढ्याची एक नवीच पद्धत सुरू झाली.



“थांबा!” काही स्त्रिया एमेलाइनला म्हणाल्या. “घोषणा देणं, लढणं हे सगळं बायकांना शोभत नाही. यामुळे तर पुरूषमंडळी आपल्याला मतदानाचा हक्क द्यायला आणखी कचरतील.”

“थांबा!” इतर स्त्रिया म्हणाल्या. “बायकांनी बुद्धिमान असल्याचा आव आणू नये. आपण पुरुषांचे ऐकले पाहिजे!”

पुरूष एमेलाइनची चेष्टा करू लागले, तिच्यावर थुंकू लागले. एकदा तर त्यांनी तिला लाथ मारून जमिनीवर पाडले.

इतक्या वर्षांनंतर, आता तिच्याकडे फारसे पैसे उरले नव्हते. तिने आपली नोकरी, आपली मित्रमंडळी गमावली होती. तिला बऱ्याचदा तुरुंगात डांबले जात असे.



पण काहीच फरक पडला नाही. “पंतप्रधान काही विशेष करत नाहीयेत,” एमेलाइन म्हणाली. “खरंतर ते काहीच करत नाहीयेत. आपल्याला परत एकदा मोर्चा काढायला हवा.”

एमेलाइन आणि 450 स्त्रियांनी संसदेवर मोर्चा नेला. पण पंतप्रधान त्यांना भेटले नाहीत. यानंतर जे काही घडले त्याची इतिहासात *ब्लॅक फ्रायडे* अशी नोंद झाली.



“आपण हार मानायची नाही!” एमेलाइन म्हणाली.

राजकारणी नेते उबून गेले, अगदी राजासुद्धा! पण त्यांनी काहीच कृती केली नाही.



“त्यांच्या सगळ्या खिडक्या फोडून टाका!” एमेलाइन म्हणाली. “आपल्या बायकांचा सगळा राग ओकून टाका!”

मग मार्च महिन्यातील एके दिवशी सगळ्या स्त्रिया लंडनच्या सर्वाधिक वर्दळीच्या व्यापारी रस्त्यावर गेल्या. तिथे त्यांनी आपला सारा राग बाहेर काढला.....



स्त्रिया मोठ्या संख्येत तुरुंगात गेल्या. एमेलाइन बऱ्याचदा त्यांच्यात असे. पण तुरुंगसुद्धा तिला रोखू शकला नाही.


“अडचणी निर्माण करा!” ती म्हणाली. “घोषणा द्या! किंचाळा! तोडफोड करा!”

स्त्रियांनी तिच्या म्हणण्याप्रमाणे केले.



“आम्ही काहीही सहन करू शकतो,” स्त्रिया म्हणू लागल्या. “आम्ही आपली नोकरी, आपलं घर, आपलं स्वातंत्र्य हे सगळं गमावू. गरज पडली तर आम्ही पँकहर्स्टबाईंसोबत मृत्यूला सामोरे जाऊ!”





"तिथे खूप हिंसा होतेय," काही लोक म्हणू लागले.

"फार नाही काही!" एमेलाइनने स्पष्ट केले. "आम्ही आणखी हिंसा करू! पन्नास वर्ष स्त्रियांनी मतदानाच्या हक्कासाठी शांततेने काम केलं. पण आमची मागणी पूर्ण झाली नाही!"

तेव्हाच एक भीषण अपघात घडला.

एमिली डेव्हिसन नावाच्या एका बाईने स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळत नाही म्हणून एक मोठी घोड्यांची शर्यत रोखायचा प्रयत्न केला. पण त्यांतील एका घोड्याने तिला खाली पाडले आणि त्यात एमिलीचा मृत्यू झाला.



एमेलाइन आता 55 वर्षांची होती आणि पुन्हा एकदा तुरुंगात होती.


“आम्हाला मतदानाचा हक्क द्या, नाहीतर मरण द्या!” असे म्हणून तिने उपोषण आरंभले. तुरुंगातील इतर स्त्रियांनीही उपोषण सुरू केले.

“त्यांना बळजबरीने खाऊ घाला,” राजाने आदेश दिला. फारच भयानक आणि दुःखाची गोष्ट होती ही.



तुरुंगातील अधिकाऱ्यांनी एमेलाइनलाही बळजबरीने खाऊ घालायचा प्रयत्न केला. पण तिने अजिबात खाल्ले नाही.

जेव्हा ती मरणाच्या दारात पोहोचे, तेव्हा ते तिची तुरुंगातून सुटका करत आणि ती बरी झाली की तिला पुन्हा तुरुंगात टाकत.



एमेलाइन मृत्युला स्पर्श करून परतली.

पुढल्या वर्षी पहिले महायुद्ध सुरू झाले. “आम्हाला मदत करा!” राजकारणी म्हणू लागले. त्यांनी तिची आणि तुरुंगातील इतर स्त्रियांची सुटका केली. “लोक तुमचं ऐकतात.”

“आता मतदानाच्या हक्काने थोडं थांबायला हवं,” एमेलाइन म्हणाली. “आपल्याला आधी हे युद्ध जिंकायचंय!”



“तुम्ही स्त्रियांनी या युद्धात महान काम केलंय,” युद्ध जिंकल्यावर राजकारणी नेते म्हणू लागले.

मग त्यांनी 30 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या स्त्रियांना मतदानाचा हक्क दिला.

दहा वर्षांनी 21 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. याबरोबरच एमेलाइनचा लढा समाप्त झाला.

काही आठवड्यांतच एमेलाइनचा मृत्यू झाला.




आणखी काही घटना

सफ्राजेट (स्त्रियांना मतदानाचा हक्क)

एमेलाइन आणि तिच्या समर्थकांना *सफ्राजेट* म्हणतात. *सफ्रा* म्हणजे *मतदान करण्यास परवानगी*. आज सर्व स्त्री-पुरुषांना वयाच्या 18 व्या वर्षी मतदान करता येते.

स्त्रियांना मतदानाचा हक्क

एमेलाइन नेहमीच आपल्या ध्येयाच्या प्रचारासाठी नवनव्या पद्धतींचा विचार करत असे. सफ्राजेटने गरम हवेच्या फुग्यांतून आपली पत्रके खाली टाकली. त्यांनी नद्यांतून प्रवास करत, वर-खाली हेलकावे खात कर्ण्याद्वारे घोषणा दिल्या.



त्यांनी रस्त्यांवर भाषणे दिली, ते सँडविच फलक बांधून चालले, त्यांनी सापशिडीसारखा नवाच खेळ तयार केला. या खेळाला ते, *सफ्राजेट्स इन अँड आऊट ऑफ प्रिझन (तुरुंगाच्या आत आणि बाहेर)* असे म्हणू लागले.

दगड गोळा करणे आणि फेकणे

सफ्राजेट मोर्च्यात मतदानाच्या हक्काच्या मागणीसाठी स्त्रिया दगड फेकून खिडक्या फोडत. लंडनमध्ये सुटे दगड मिळणे कठीणच होते. म्हणून काही स्त्रिया रात्री जवळच्या गावांत जाऊन दगड आणत. एमेलाइनचा नेम बरा नव्हता. बराच सराव करूनही, ती डाउनिंग स्ट्रीटच्या मोर्च्यात एकाही खिडकीची काच कधी फोडू शकली नाही.

एमेलाइन पँकहर्स्टच्या आयुष्यातील महत्त्वाच्या तारखा

1858	एमेलाइन गोल्डेनचा जन्म.
1879	एमेलाइनने रिचर्ड पँकहर्स्टशी लग्न केले.
1880	एमेलाइनची मुलगी ख्रिस्ताबेलचा जन्म.
1898	रिचर्ड पंकहर्स्टचे निधन
1903	महिला सामाजिक आणि राजकीय संघटना स्थापन.
1906	संसदेवर पहिला मोर्चा.
1907	एमेलाइन पहिल्यांदा तुरुंगात गेली.
1909	स्त्रियांच्या मतदानाच्या हक्कासाठी उपोषण.
1910	ब्लॅक फ्रायडे दिवशी पोलिसांनी मोर्चेकऱ्यांवर कठोर कारवाई केली.
1912	स्त्रियांनी कुऱ्हाड आणि हातोडे घेऊन लंडनच्या वेस्ट एंड भागावर हल्ला केला.
1913	एमिली डेव्हिसनचे निधन. एमेलाइनला एका वर्षाची कैद.
1914	पहिले महायुद्ध सुरू.
1918	पहिले महायुद्ध समाप्त. 30 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त.
1928	21 वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त.